# श्री. शिवाजी शिक्षण संस्था अमरावती, व्दारा संचालीत
# श्री. आर. आर. लाहोटी विज्ञान महाविद्यालय, मोर्शी
## वरिष्ठ महाविद्यालयीन
## — वार्षिक अहवाल —
## २०१७—२०१८

श्री.शिवाजी शिक्षण संस्था अमरावती द्वारा संचालीत,श्री.आर.आर.लाहोटी विज्ञान महाविद्यालय पितृसंस्था म्हणून कार्य करते. जिची स्थापना डॉ.पंजाबराव भाऊसाहेब देशमुख यांनी १९३२ मध्ये केली. संस्था विदर्भभर २९० पेक्षा जास्त महाविद्यालय व विद्यालय चालविते. ज्या माध्यमातून भाऊसाहेबांचे सर्व तळागळातील विद्यार्थ्यांना शिक्षण देण्याचे ध्येय पार पाडले जाते.

महाराष्ट्र राज्य शासनाने सन १९७१—७२मध्ये मोर्शी या तालुक्याला विज्ञानाच्या शाखेसाठी मान्यता देवून श्री.शिवाजी शिक्षण संस्थेने हे महाविद्यालय सुरु केले. जरी भौतिक स्तरावर महाविद्यालय छोटे असले तरी पण आज आजूबाजूच्या सर्व ग्रामिण स्तरावरील विद्यार्थ्यांसाठी हे महाविद्यालय म्हणजे दिशादर्शकाचे कार्य पार पाडत आहे.

पाचव्या दशकामध्ये कार्य करतांना श्री.आर.आर.लाहोटी विज्ञान महाविद्यालय मोर्शी शहरामधील एक महत्वाचे महाविद्यालय म्हणून ओळख स्थापन केली आहे. महाविद्यालय हे संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाशी सलग्नीत असून वर्ष २०१२ मध्ये या महाविद्यालयाला नॅक ने 'ब' दर्जा CGPA २.५० ने गौरविले आहे.

महाविद्यालयाच्या सुरुवातीलाच वनस्पतीशास्त्र,रसायनशास्त्र,भौतिकशास्त्र,गणित, प्राणिशास्त्र,शारिरिक शिक्षण या विषयांसह महाविद्यालयाला सुरुवात झाली होती. पुढे २००७—२००८ मध्ये यु.जी.सी. Water Quality & Soil Testing या पदविका अभ्यासक्रमाला मान्यता दिली. कालांतराने पदवी स्तरासाठी Computer Science व Computer Application या दोन विषयांचाही समावेश केरण्यात आला.

**पदवी स्तरासाठी विषयांची निश्चीतता**

पदवी स्तरासाठी (B.Sc.)साठी खालीलप्रमाणे विषयांचे/कार्यक्रमाचे विस्तीकरण करण्यात आले.

| विषय | एकूण जागा |
|---|---|
| १. गणित, भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र, | |
| २. रसायनशास्त्र,वनस्पतीशास्त्र,प्राणिशास्त्र, | प्रत्येकी १२० जागा |
| ३. संगणकशास्त्र,गणित,भौतिकशास्त्र, | |
| **नाविण्यपूर्ण अभ्यासक्रम** | |
| ४. आहार तंत्रज्ञान (फुड प्रोसेसिंग ॲण्ड टेक्नालॉजी) | |

**सत्रारंभ:—** सत्र २०१७ —१८ चे सत्र ते दि. १३/०६/२०१७ ते २६/०४/२०१८ पर्यंत होते. २०१७—२०१८ पदवीसाठी एकूण विद्यार्थी संख्या ७०८ होती.

**विद्यार्थी परिषदेचे गठन:—** मा. कुलगुरु च्या आदेशान्वये,सं.गा.बा.अमरावती विद्यापीठ प्रतिनिधीच्या निवडीची प्रक्रिया मा.प्राचार्य डॉ.जी.आर.तडस व सुगंध बंड यांच्या मार्गदर्शनाखाली दि.०४/०१/२०१८ ला संपन्न झाली व दर्शन ठवळी यांची विद्यापीठ प्रतिनिधि म्हणुन निवड झाली.

### विभागीय अहवाल

**वनस्पतीशास्त्र विभाग :—** शैक्षणिक सत्र २०१७—१८ मध्ये वनस्पतीशास्त्र विभागाचे प्रा. डॉ. गिरिश कांबळे हे प्राचार्य पदी लिन रजेवर गेले. या सत्रात बि.एस.सी च्या विद्यार्थ्यांचे सेमीनार व शैक्षणिक सहलीचे आयोजन करण्यात आले. शैक्षणिक सत्र २०१७—१८ मध्ये माझे या माहविद्यालयात स्थानांतर होवून, मी. दिनांक २१/०६/२०१८ ला रूजू झालो. या विभागात तासिका तत्वार कु. सि. आर. नेरकर, कु. टि. ए. चौधरी व श्री. आर. आर. बलखंडे यांची नेमणूक करण्यात आली. विद्यार्थ्यांच्या कल्याणाकरीता या सत्रात वनस्पतीशास्त्र उद्यान विकसीत करण्याची सुरूवात केलेली आहे. तसेच बि.एस.सी. भाग १ व २ यांच्या शैक्षणिक सहलीचे आयोजन करण्यात येत आहे. सोबतच नामांकित अशा व्यक्तींच्या मार्गदर्शनाचे नियोजन सुध्दा वनस्पतीशास्त्र विभाग करित आहे. तसेच मा. प्राचार्य यांच्या मार्गदर्शनामध्ये नॅक च्या कामात उस्फूर्तपणे सहभाग घेत आहे.

**प्राणीशास्त्र विभाग :—** प्राणीशास्त्र या विषयाकरीता २०१७—२०१८ मध्ये B.Sc. I मध्ये ११० विद्यार्थी, B.Sc. II मध्ये ७३ विद्यार्थी, B.Sc. III मध्ये ४४ विद्यार्थी प्रवेशित होते. या सत्रामध्ये डॉ.ए.के.सोळंके विभाग प्रमुख, यांनी आपले कार्य पार पाडले . प्रा. के.टी. खेरडे, प्रा. एस. एस.खेरडे, प्रा.एस. एस.पाबळे व प्रा. के. ई. लांडगे या सर्व CHB नी या सत्रामध्ये प्राध्यापकाचे

कार्य केले. तसेच नॉन टिचिंग मध्ये श्री रवी महाजन व श्री विश्वास मनोहरे कार्यरत आहे. प्राणीशास्त्र विभागात कु. धोटे यांच्या अध्यक्षतेखाली प्राणीशास्त्र मंडळाचे गठण करण्यात आले. मंडळातर्फे ग्रुप चर्चा व सेमीनार आयोजन करण्यात आले. डॉ. ए. के. सोळंके यांनी दिनांक ५/११/२०१७ ते २५/११/२०१७ पर्यंत आर.टी.एम. नागपुर विद्यापीठ नागपुर येथे रिफ्रेशर कोर्स पुर्ण केला. प्राणीशास्त्र विभागातर्फे फेब्रुवारी २०१७ ला लोणार येथे दोन दिवसाची शैक्षणिक सहल आयोजित करण्यात आली. डॉ.ए.के.सोळंके यांनी "टॉक्झीनीटी ऑफ मरक्युरी ऑन सम बॉयोकेमीकल पॅरामीटर इन कटला कटला फिश?" या विषयावर आयुश विद्याभारती इंटरनॅशनल जर्नलमध्ये शोधनिबंध प्रकाशित केला.

**रसायनशास्त्र विभाग** :—या सत्रामध्ये डॉ. पि.एम. दहिकर विभाग प्रमुख, श्री. जी. डी. रावते साहायक प्राध्यापक यांनी आपले कार्य पार पाडले . डॉ. एम. एस. लुंगे, व्ही. आर. नेरकर, एस.डी. रानोटकर, कु. एच.ए. होले, कु. एम.एम. निकम व आर.एम.धलवार या सर्व CHB नी या सत्रामध्ये प्राध्यापकाचे कार्य केले. पदवी अभ्यासक्रमासोबत Food Processing and Technology हा विषय यु.जी.सी. व्दारा कार्यन्वीत अभ्यासक्रम चालविण्यात आले. विभागातील डॉ. पि.एम. दहिकर यांनी राष्ट्रीय चर्चासत्रामध्ये सहभाग घेतला. व एक शोधनिबंध आंतरराष्ट्रीय संशोधन पत्रिकेत प्रसिध्द झाले. श्री. जी. डी. रावते यांनी सं.गा.बाबा अमरावती विद्यापिठ अमरावती उन्हाळी परीक्षा २०१८ करीता केन्द्रप्रमुख म्हणुन काम पाहीले. विभागामध्ये विविध उपक्रम घेतल्या जातात. Seminar Competition, Unit test, Project / Seminar, Regular Assignments घेतले जातात. B.Sc. III मध्ये कु. प्राची श्रीराव हीने ८६% आणि भुषण धोटे ८४% गुण प्राप्त करुन प्रथम आले. डॉ. पि.एम. दहिकर व श्री. जी. डी. रावते यांनी एक यु.जी.सी. चा लघु संशोधन प्रकल्प पुर्ण केला आहे. अध्यापणाकरिता विविध दृक–श्राव्य साधने L.C.D., T.V., Power point presentation (PPT) , Models, Charts यांचा वापर करण्यात आला

भौतिकशास्त्र विभाग :—या वार्षिक वर्षात विभागामध्ये दोन नियमित प्राध्यापक आहेत. त्यापैकी प्रा. जी.बी. हरडे हे विभागप्रमुख व सहयोगी प्राध्यापक तर प्रा. डॉ. ए. व्ही. कोहळे हे सहाय्यक प्राध्यापक म्हणुन कार्यरत आहे. विभागामध्ये श्री. व्ही. डब्ल्यु. पडोळे व श्री. पाटील हे दोन शिक्षकेत्तर कर्मचारी म्हणुन कार्यरत आहेत. या वर्षात प्रा. जी. बी. हरडे यांनी त्यांच्या संशोधनाची समरी विद्यापीठाला सबमिट केली व ते लवकरात लवकर शोधनिबंध सबमिट करणार आहे. विभागाचा भौतिकशास्त्र विषयाचा उन्हाळी २०१८ चा निकाल लागला असुन तो अतिशय चांगला आहे. B.Sc. I (Sem II) – 76.47%, B.Sc. II (Sem IV) – 45.66%, B.Sc. III(Sem- VI)- 80.26% आहे.विभागातर्फे विद्यार्थ्यांच्या सुप्त गुणांना वाव मिळण्याकरीता विविध उपक्रम राबविले जातात जसे की Seminar Competation, Quiz Competation, Regular Assingments, Unit Test. तसेच विभागातील प्राध्यापक महाविद्यालयातील विविध समित्यांमध्ये कार्य करीत आहे.

**गणित विभाग** :— सत्र २०१७—१८ मध्ये गणित विषयात प्रवेशित विद्यार्थ्यांच्या संख्येत वाढ झाली, त्याचप्रामणे उन्हीळी २०१८ च्या गणित विषयाच्या निकालत सुध्दा खुप वाढ झाली. ह्या सत्रात विभागप्रमुख डॉ. कल्पना ना. पवार यांच्या सोबत श्री. मंगेश माकोडे, कु तृप्ती घोरमाडे व कु. भावना निकम ह्यांनी तसकि तत्वावर काम केले. दिनांक २४ मार्च २०१८ रोजी गणित विभागाने वैदीक गणित या विषयावर एक दिवसीय कार्यशाळेचे आयोजन केले याकरीता मार्गदर्शक म्हणून सन्माननिय डॉ. अनंत व्यवहारे वैदीक गणितज्ञ व माजी विभागप्रमुख मेहता विज्ञान महाविद्यालय, नागपुर, डॉ. रिषीकुमार अग्रवाल, विभागप्रमुख, हिस्लॉप कॉलेज, नागपुर, सौ. शेफाली जोशी व श्री. सुनिल पाटणकर, नागपुर यांनी विद्यार्थ्यांना स्पर्धा परिक्षेकरीता वैदीक गणित कसे उत्कृष्ट पणे व सोप्या पध्दतीने सोडविता येते ह्याबद्दल माहिती दिली. कार्यक्रमाचे औचित्य साधुन विभागप्रमुख डॉ. कल्पना ना. पवार ह्यांनी प्रविण्याप्राप्त विद्यार्थ्यांचे कौतूक सत्कार माननिय श्री. नरेशचंद्रजी ठाकरे, उपाध्याक्ष, श्री शिवाजी शिक्षण संस्था, अमरावती यांच्या हस्ते करण्यात आला. या कर्यशाळेला उस्फुर्त प्रतिसाद दिला. एकूण १५० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. ह्या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान महाविद्यालयाचे प्राचार्य, डॉ. जी. आर. तडस यांनी भुषविले व कार्यक्रमाचे संचालन विभागप्रमुख डॉ. कल्पना ना. पवार ह्यांनी केले. त्याचप्रमाणे गणित विभागप्रमुख डॉ. कल्पना ना. पवार ह्यांनी दिनांक २९/०३/२०१८ रोजी Effectve Communiation Skills या विषयावर एक दिवसीय कार्यशाळेचे आयोजन केले याकरीता मार्गदर्शक म्हणून श्री नितीन मोदी ह्यांना बोलविण्यात आले होते. मोदी सरांनी ह्या विषयावर अत्यंत उत्कृष्ठ पध्दतीने विद्यार्थ्यांचा सहभाग संपादन करून त्यांना मार्गदर्शन केले. ह्या कार्यशाळेला विद्यार्थ्यांचा उत्फूर्त प्रतिसाद मिळाला व विद्यार्थ्यांनी अशाप्रकारच्या कार्यशाळेचे महाविद्यालयात दरवर्षी आयोजन करण्याचे निवेदन केले ह्या दोन्ही कार्यशाळेत सहभागी